# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **मा. कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट**

सकाळ
शुक्रवार,
२६ जून २०१५
४



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांची कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांना माहिती देताना संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील (उजवीकडील).

### राजगुरू महाविद्यालयास कुलगुरू डॉ. गाडे यांची भेट

राजगुरुनगर, ता. २५ : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांनी भेट दिली. महाविद्यालयात सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी घेतली. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी कुलगुरूंचे स्वागत केले. विद्यार्थ्यांची वाढती संख्या, विनाअनुदानित तुकड्यांचा प्रश्न, प्राध्यापकांच्या रिक्त जागा याबाबत त्यांनी कुलगुरूंना माहिती दिली. डॉ. गाडे यांनी महाविद्यालयाची अभ्यासिका; तसेच विविध विभागांची पाहणी केली. विद्यार्थ्यांच्या अतिरिक्त प्रवेशाबाबतचा प्रश्न सोडविला जाईल, असे त्यांनी सांगितले. साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी संस्थेचे अभिनंदन केले. प्रास्ताविक प्रा. ए. जी. कुलकर्णी यांनी केले. या वेळी डॉ. व्ही. बी. गायकवाड, डॉ. विद्या गारगोटे, दादाभाऊ शिनलकर, डॉ. दिलीप ढवळे, संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, रजिस्ट्रार कैलास पाचारणे; तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

# कुलगुरूंची राजगुरू महाविद्यालयास भेट

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयास भेट देऊन महाविद्यालयाची पाहणी केली. त्यांचे स्वागत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. त्यांना महाविद्यालयाने राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.



**राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाची पाहणी करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे.**

या वेळी वरिष्ठ महाविद्यालयाचा निकाल, विद्यार्थ्यांची वाढती संख्या, विनाअनुदानित तुकड्यांचा प्रश्न, प्राध्यापकांच्या रिक्त जागा अशा विविध मुद्यांवर चर्चा झाली. कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांनी महाविद्यालयाची अभ्यासिका, विविध विभाग यांची पाहणी केली. महाविद्यालयाच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करताना कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांनी महाविद्यालयाचे विद्यापीठ पातळीवरील विद्यार्थ्यांच्या अतिरिक्त प्रवेशाबाबताचा प्रश्न सोडविले जाईल, असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ए. जी. कुलकर्णी यांनी केले. या प्रसंगी विद्यापीठाचे बीसीयूडी संचालक डॉ. व्ही. बी. गायकवाड, वित्त व लेखा अधिकारी डॉ. विद्या गारगोटे, सिनेट सदस्य दादाभाऊ शिनलकर, डॉ. दिलीप ढवळे, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, रजिस्ट्रार कैलास पाचारणे, संजय शिंदे व महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख